# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### पवनी तालुक्यातील अड्याळ व ब्रम्ही जिल्हा परिषद क्षेत्रात विकास कामांचे झालेले भूमिपूजन व लोकार्पण कार्यक्रम अवैध असल्याबाबत

**(१) ६३२८७ (२९-०८-२०१६). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पवनी तालुक्यातील अड्याळ व ब्रम्ही जिल्हा परिषद क्षेत्रात दिनांक १५ एप्रिल,२०१६ रोजी वा त्यासुमारास विकास कामांचे भूमिपूजन व लोकार्पण कार्यक्रम स्थानिक लोकप्रतिनिधीना डावलून करण्यात आले आहे,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधीना डावलण्याचे कारण काय आहे व राजशिष्टाचाराला सोडून घेण्यात आलेला हा कार्यक्रम अवैध असल्याचे मुख्य कार्यपालन अधिकारी, जिल्हा परिषद भंडारा यांनी दिनांक २६ एप्रिल, २०१६ रोजी वा त्यासुमारास कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच दिनांक ३ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास ग्रामविकास विभागाकडे केलेल्या तक्रारीवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३०-०७-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही.

जिल्हा परिषद क्षेत्रातील विकास कामांचे भूमिपूजन व लोकार्पण कार्यक्रम जिल्हा परिषदेकडून आयोजित करण्यात आलेला नाही. तसेच, जिल्हा परिषदेची कोणतीही परवानगी घेण्यात आलेली नाही.

(३) दिनांक ३ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास केलेली तक्रार या विभागात आढळून येत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चिंचोली पळसगाव (ता.उमरगा, जि.उस्मानाबाद) येथील साठवण तलावाच्या सांडव्याची उंची वाढविण्याबाबत**

**(२) ७२२०० (२७-०१-२०१७). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिंचोली पळसगाव (ता.उमरगा, जि.उस्मानाबाद) येथील साठवण तलावाच्या सांडव्याची उंची वाढविणेबाबत उमरगा-लोहारा येथील लोकप्रतिनिधींनी दिनांक १४ मार्च, २०१६ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे विनंती केली परंतु सदर निवेदनावर कुठलीही कार्यवाही झाली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर साठवण तलावाच्या सांडव्याची उंची वाढविण्यासह निवेदनावर कार्यवाही न करणाऱ्या अधिकाऱ्यावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३०-०७-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) सदर निवेदनाबाबत दि.३१/०७/२०१७ च्या शासन पत्रान्वये वस्तुस्थिती अवगत करण्यात आली असल्याने कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पाटण (जि.सातारा) येथील पंचायत समितीच्या नूतन कार्यालयातील फर्निचर करण्याच्या कामास निधी मिळण्याबाबत**

**(३) ७४९६२ (१४-०४-२०१७). श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामीण विकास व पंचायत राज विभांतर्गत पाटण (जि.सातारा) तालुक्याच्या ठिकाणी पंचायत समितीची नूतन इमारत बांधण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने मंजूर केलेल्या या इमारतीच्या कामामध्ये फर्निचर करण्याच्या कामांचा समावेश नसल्याने या नूतन इमारतीमधील फर्निचरचे काम झाले नसल्याने पंचायत समितीचे कार्यालय स्थलांतरित करण्यास विलंब लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पाटण मतदारसंघातील पाटण येथील पंचायत समितीच्या नूतन कार्यालयातील फर्निचर करण्याच्या कामास तात्काळ निधी उपलब्ध करून मिळावा याकरिता ८१ लाख १८ हजार रुपयांचे फर्निचरचे अंदाजपत्रक तयार करून ते ग्रामीण विकास व पंचायत राज विभागाचे प्रधान सचिव यांच्यामार्फत शासनाकडे मान्यतेकरिता सादर करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३०-०७-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

पाटण पंचायत समिती प्रशासकीय इमारतीचे काम माहे ऑक्टोबर, २०१६ ला पुर्ण झाले आहे. तथापि, नव्याने स्थापन झालेल्या नगर पंचायतीकडून पाणीपुरवठा जोडणीस विलंब झाल्याने कार्यालय स्थलांतरास विलंब झाला आहे.

(३) हे खरे आहे.

(४) पाटण पंचायत समिती फर्निचरच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर जिल्हयातील कळमेश्वर आणि सावनेर पंचायत समितीच्या प्रशासकीय इमारतीच्या वाढीव बांधकामास निधीसह मंजूरी मिळण्याबाबत

**(४) ७८१४८ (१८-०४-२०१७). श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हयातील कळमेश्वर आणि सावनेर पंचायत समिती प्रशासकीय इमारतीचे पहीला माळयाचे बांधकाम करण्याकरिता कार्यकारी अभियंता जिल्हा परिषद बांधकाम विभाग नागपूर यांनी प्रत्येकी ४८४.४३ लक्ष रकमेचा प्रस्ताव ग्रामविकास विभाग मंत्रालय यांच्याकडे पत्र क्र जिपना/बांध/का ४(५)/प्रई/४७९२/१६ दिनांक २० जून,२०१६ रोजी आणि जिपना/बांध/का ४(५)/प्रई/४६२२/१६ दिनांक २० जून,२०१६ रोजी पाठविण्यात आले असता अद्यापही या प्रस्तावास मंजूरी मिळालेली नसल्याने दोन्ही पंचायत समितीच्या प्रशासकीय इमारतीचे वाढीव बांधकाम करता आले नसल्याची माहिती दिनांक ३१ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्ताव मंजूर करुन निधीसह प्रशासकीय मान्यता मिळण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३०-०७-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) कळमेश्वर व सावनेर पंचायत समितीच्या नवीन प्रशासकीय इमारतीच्या पहिल्या मजल्याच्या व वाढीव बांधकामास शासन निर्णय दिनांक १८ ऑगस्ट, २०१७ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.

---

**संगमनेर (जि.अहमदनगर) तालुक्यातील कुरकुटवाडी व आंबीदुमाला या दोन गावांना पाटचारी अभावी शेतीस पाणी मिळत नसल्याबाबत**

**(५) ७८२०८ (२०-०४-२०१७). श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संगमनेर (जि.अहमदनगर) तालुक्यातील कुरकुटवाडी व आंबीदुमाला या दोन गावांना कोटमारा धरणाच्या पाटचारी काढण्यात आली नसल्याने शेतीस पाणीपुरवठा होत नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, तद्नुसार कोटमारा धरणास सदर दोन गावांना पाटचारी काढणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३०-०७-२०१८) :** (१) होय.

(२) कालव्यावरील विमोचकाचे काम झालेले नसल्याने शेतीस पाणी पुरवठा झालेला नाही. विमोचकाचे काम चालू असून लवकरच पाणी सोडण्याच्या दृष्टीने कार्यवाही करणेत येत आहे.

(३) कालव्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कारंजा (जि.वाशिम) येथील पंचायत समितीची नवीन इमारत करण्यासाठी प्रशासकीय मंजुरीसह निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(६) ८०६०८ (२०-०४-२०१७). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कारंजा (जि.वाशिम) येथील पंचायत समितीची नवीन इमारीत करण्यासाठी प्रशासकीय मंजुरीसह निधी देण्याबाबत लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३०-०७-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) कारंजा पंचायत समिती नवीन प्रशासकीय इमारत बांधकामासाठी प्रस्तावित असलेली जागा जिल्हा परिषदेच्या नावावर नसल्यामुळे, सद्यस्थितीत प्रशासकीय मान्यता देता येत नाही. प्रस्तावित जागा स्थानिक स्वराज संस्थेच्या नावावर करुन घेण्याबाबत जिल्हा परिषदेला

कळविण्यात आले आहे. जागा जिल्हा परिषदेच्या नावावर करुन घेण्याची कार्यवाही पंचायत समिती स्तरावर सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## भिवंडी-कल्याण (जि.ठाणे) तालुक्यातील नागरिकांना प्रवासासाठी बंद असलेला नांदकर-अटाळी होडीचा मार्ग सुरु करण्याबाबत

**(७) ८२३३७ (१८-०४-२०१७). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी-कल्याण (जि.ठाणे) तालुक्यांमधून वाहणाऱ्या काळूनदीवर बांधण्यात आलेला पूल नादुरुस्त झाला असून या परिसरातील नागरिकांना प्रवासासाठी बंद असलेला नांदकर-अटाळी होडीचा मार्ग सुरु करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरिक यांनी माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.ठाणे यांच्याकडे लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त ठिकाणी होडीचा प्रवास सुरु केल्यास भिवंडीच्या पूर्वपट्टयातील नांदकर, सांगे, किरवली, इताडे व इतर गावातील नागरिकांना लाभ होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर निवेदनानुसार नांदकर-अटाळी होडीचा मार्ग सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३०-०७-२०१८) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) व (४) यापुर्वी, प्रत्येक वर्षी सदरचा होडी प्रवास सुरु करण्याकरीता दरपत्रक मागविण्यात आले होते, परंतु ग्रा.वि.वि.शा.नि. दिनांक ०२.०५.२०१४ मधील अटी व शर्तीनुसार पात्र होडी मालक सहभागी न झाल्याने लिलाव झालेला नाही. या बोट प्रवासाकरीता लिलाव प्रक्रीयेबाबत दिनांक ११.११.२०१६ रोजी प्रसिध्दी देण्यात आली असता ३ पात्र होडी मालकांकडून दरपत्रक सादर करण्यात आले होते. यापैकी, श्री.गजानन पाटील, सुरई ता.भिवंडी जि. ठाणे यांचे सर्वात जास्त दराचे दरपत्रक अंतिम करण्यात आले. संबंधित बोट धारकाने जि.प. स सादर केलेली प्रादेशिक बंदर अधिकारी, मोरा बंदर समुह यांच्याकडील मान्यता व सदरची बोट वाहतुकीसाठी प्रमाणित असल्याची खात्री करण्याकरीता प्रादेशिक बंदर अधिकारी, मोरा बंदर समुह, ठाणे यांच्याकडे दिनांक २९.११.२०१६ रोजी सादर करण्यात आले आहे. संबंधित कार्यालयाकडून याबाबत अहवाल प्राप्त होताच सदर बोट धारक श्री.गजानन पाटील, सुरई ता.भिवंडी जि.ठाणे यांची बोट सेवा सुरु करण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल असे जिल्हा परिषदेने कळविले आहे.

---

**राष्ट्रीय ग्राम स्वराज्य योजनेअंतर्गत इमारत नसलेल्या ग्रामपंचायतींना ग्रामपंचायत कार्यालयासाठी इमारत देण्याबाबत**

**(८) ८६६९५ (११-०८-२०१७). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय ग्राम स्वराज्य योजने अंतर्गत ज्या ग्रामपंचायतीस स्वत:ची कार्यालयीन इमारत नाही, अशा उस्मानाबाद जिल्ह्यातील ग्रांमपंचायतीची माहिती सह सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडून मागविण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहु योजनेंतर्गत उस्मानाबाद मतदार संघातील माहिती शासनास प्राप्त झालेली आहे काय व उस्मानाबाद, कळंब या दोन तालुक्यातून किती ग्रामपंचायतींना स्वतंत्र इमारत नसल्याचा प्रस्ताव आलेला आहे,

(३) असल्यास, त्यानुसार या प्रस्तावावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३०-०७-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) उस्मानाबाद तालुक्यातील एकूण ८ ग्रामपंचायतींना व कळंब तालुक्यातील एकूण ५ ग्रामपंचायतींना स्वतंत्र इमारत उपलब्ध नाही.

(३) व (४) स्वतंत्र इमारत नसलेल्या ग्रामपंचायतींना ग्रामपंचायतींच्या इमारत बांधकामास अनुदान देण्यासाठी स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत व महिला सक्षमीकरण अभियान योजना सुरु करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

---

**वैभववाडी (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील वैभववाडी-नावडे या रस्त्यांचे तसेच रस्त्यावरील मोऱ्यांचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(९) ८७४३२ (१८-०८-२०१७). श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैभववाडी (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील वैभववाडी-नावळे या रस्त्यांसाठी मुख्यमंत्री सडक योजनेतून ३ कोटी ९० लाखांचा निधी मंजूर झाला असून सदरहू काम सुरू होवून आजमितीस ४ महिने उलटले तरीही काम अपूर्णावस्थेत असून सदरहू रस्त्यांचे तसेच रस्त्यांवरील मोऱ्यांचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाल्याने संबंधित यंत्रणेने तात्काळ काम बंद करून कामांच्या गुणवत्तेकडे लक्ष द्यावे अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू मार्गांवरील रस्त्यांवरील १७ ठिकाणच्या मोऱ्या मंजूर झाल्या असून आजमितीस केवळ एकाच मोरीचे काम पूर्ण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार सदरहू रस्त्यांवरील मोऱ्यांचे तसेच रस्त्यांचे निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३०-०७-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.
सदर रस्त्याच्या कामास मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतर्गत रु.३६०.४६ लक्ष किंमतीस प्रशासकीय मान्यता दर्शविली असून माहे ऑक्टोबर २०१६ मध्ये कामाचे आदेश देण्यात आलेले आहेत. काम पूर्ण करण्याची मुदत १२ महीने आहे. सदर कामाच्या गुणवत्तेबाबत कोणतेही लेखी निवेदन प्राप्त झाले नसून स्थानिक नागरिकांनी संबंधीत अधिकाऱ्यांशी चर्चा केल्याचे आढळून येते.
(२) होय हे खरे असून उर्वरीत कामे प्रगतीपथावर आहेत.
(३) व (४) कामाची तपासणी SQM व SSQM मार्फत झाली असून त्यांनी काम समाधानकारक असल्याचा शेरा दिला आहे.

---

**वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट व समुद्रपूर येथील पंचायत समितीच्या प्रशासकीय इमारत बांधकामाच्या प्रस्तावास प्रशासकीय मंजुरी मिळण्याबाबत**

**(१०) ८८४४३ (११-०८-२०१७). श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.प्रभुदास भिलावेकर (मेळघाट) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट व समुद्रपूर येथील पंचायत समितीच्या प्रशासकीय इमारत बांधकामाच्या ६ कोटी ६९ लक्ष किंमतीच्या प्रस्तावास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी (हिंगणघाट) दिनांक १४ मार्च, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.ग्रामविकास व मा.जलसंधारण मंत्री यांना निवेदन देऊन मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनानुसार सदरहू प्रस्तावास प्रशासकीय मंजुरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३०-०७-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट व समुद्रपूर येथील पंचायत समितीच्या प्रशासकीय इमारत बांधकामाचे प्रस्ताव जिल्हा परिषदेकडून दिनांक ०१.०६.२०१६ रोजी प्राप्त झालेले आहेत. सदर प्रस्तावात आढळून आलेल्या त्रुटींची पुर्तता करण्याबाबत जिल्हा परिषद अकोला यांना दिनांक ०४.१०.२०१६ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. जिल्हा परिषदेकडून त्रुटींच्या पुर्ततेसह परिपुर्ण प्रस्ताव प्राप्त न झाल्यामुळे दिनांक ०४.७.२०१७ व दिनांक २७.११.२०१७ रोजी

स्मरणही करण्यात आले आहे. हिंगणघाट व समुद्रपूर येथील पंचायत समितीच्या प्रशासकीय इमारत बांधकामाचा परिपुर्ण प्रस्ताव शासनास अद्याप प्राप्त झालेला नाही.प्रस्ताव प्राप्त होताच निधीच्या उपलब्धतेनुसार उचित कार्यवाही करण्यात येईल.

---

## चांदुर बाजार (जि.अमरावती) तालुक्यातील पंचायत समितीच्या नविन इमारतीचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(११) ८८८८७ (११-०८-२०१७). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चांदूर बाजार (जि.अमरावती) पंचायत समितीच्या नव्याने बांधलेल्या इमारतीच्या प्रवेशद्वारावरील पोर्चच्या स्लॅबचे बांधकाम कंत्राटदाराने निकृष्ट दर्जाचे केल्याने स्लॅब कोसळला असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार स्लॅबचे निकृष्ट दर्जाचे बांधकाम करणाऱ्या कंत्राटदारांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३०-०७-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) याबाबत जिल्हा परिषद अमरावती यांनी चौकशी केली असून, चांदुर बाजार पंचायत समितीच्या नवीन प्रशासकीय इमारतीच्या प्रवेशद्वारावरील स्लॅब कंत्राटदाराने निकृष्ट बांधकाम केल्याने कोसळला नसून, पोर्चच्या स्लॅबसाठी सामान (हंडा) घेऊन जाणाऱ्या उदवाहनाची लोखंडी वायर निसटल्यामुळे हंडा सेंट्रींगच्या खांबाला जोरात धडकल्याने सेंट्रींग पडायला सुरुवात होऊन स्लॅबचा काही भाग कोसळला आहे. कोसळलेला स्लॅब कंत्राटदाराने स्वखर्चाने दुरुस्त केला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रत्नागिरी जिल्हा परिषदेच्या आरोग्य सेविका पदाच्या सरळसेवा भरतीमध्ये तीन महिलांनी खेळाची बनावट प्रमाणपत्रे जोडल्याबाबत

**(१२) ८९३७० (१२-०८-२०१७). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हा परिषदेच्या आरोग्य सेविका पदाच्या  सरळसेवा भरतीमध्ये खेळाडू आरक्षणापासून अंतिम निवड झालेल्या तीन महिलांनी खेळाची बनावट प्रमाणपत्रे जोडल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार बनावट प्रमाणपत्र तयार करुन देणारे व नोकरीसाठी बनावट प्रमाणपत्र सादर करणारे दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०१-०८-२०१८) :** (१) नाही.
रत्नागिरी जिल्हा परिषदेच्या आरोग्य सेविका पदाच्या सरळसेवा भरतीमध्ये खेळासाठी असलेल्या आरक्षणाव्दारे अंतिम निवड झालेल्या तीन महिलांनी जोडलेली खेळाची प्रमाणपत्रे बनावट नाहीत. परंतु सदर उमेदवार खेळविषयक अर्हता पूर्ण करीत नाहीत.
(२) या प्रकरणी संचालक, क्रीडा व युवा सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे चौकशी केली असता, सदर तीन उमेदवार खेळविषयक अर्हता पूर्ण करीत नसल्याबाबत कळविण्यात आले आहे.
(३) प्रमाणपत्रे बनावट नसल्यामुळे प्रमाणपत्र तयार करणा-यावंर कारवाईचा प्रश्न उद्भवत नाही.
चौकशीच्या अनुषंगाने सदर तीनही उमेदवारांना कोणत्याही प्रकारचे नियुक्ती आदेश देण्यात आलेले नाहीत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बाळापूर (जि.अकोला) तालुक्यातील ६६ पैकी २८ ग्रामपंचायतीना इमारती नसल्याबाबत**

**(१३) ९०४४१ (११-०८-२०१७). श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बाळापूर (जि.अकोला) तालुक्यातील ६६ पैकी २८ ग्रामपंचायतीना ग्रामपंचायतीचे कामकाज करण्यासाठी  इमारती नसल्याची बाब माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ग्रामपंचायतीना सुसज्ज इमारती बांधुन देण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३०-०७-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) बाळापूर तालुक्यातील स्वतंत्र ग्रामपंचायत इमारत नसलेल्या १५ व शिकस्त असलेल्या १७ ग्रामपंचायतींच्या बांधकामाकरीता जिल्हा नियोजन समितीकडे निधीची मागणी

जिल्हा परिषदेकडून करण्यात आली आहे. निधीच्या उपलब्धतेनुसार बांधकामाचे नियोजन आहे. त्याचप्रमाणे, स्वतंत्र इमारत नसलेल्या ग्रामपंचायतींना ग्रामपंचायतींच्या इमारत बांधकामासाठी स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत योजना सुरु करण्याबाबतचा शासन निर्णय दिनांक २३ जानेवारी, २०१८ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

---

**उस्मानाबाद जिल्हयातील निम्न तेरणा उपसा सिंचन योजनेबाबत**

**(१४) ९२८१६ (२२-०८-२०१७). श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्हयातील निम्न तेरणा उपसा सिंचन योजनेकरीता रुपये १२४ कोटी ८ लक्ष निधी खर्च करून ही योजना माहे एप्रिल, २००४ मध्ये पूर्ण झाली असून या योजनेद्वारे निम्न तेरणा प्रकल्पातून तीन तालुक्यातील ५ पंपगृहाद्वारे ६८९० हे. जमीन सिंचनाखाली आणण्यात येणार असल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, तद्नुसार सदर योजनेद्वारे तालुक्यातील जमिनी सिंचनाखाली आणण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३०-०८-२०१८) :** (१) उस्मानाबाद जिल्हयातील निम्न तेरणा उपसा सिंचन योजना टप्पा क्र.१ ते ५ साठी १२४.९८ कोटी खर्च झालेला असून सदर योजना दिनांक १.४.२००४ रोजी पूर्ण झालेली असून त्याद्वारे उस्मानाबाद जिल्हयातील उस्मानाबाद व लोहारा आणि लातूर जिल्हयातील औसा या तीन तालुक्यातील एकूण ६८९० हे. सिंचन क्षेत्रास लाभ देणे नियोजित आहे.

(२) दि.०१.०४.२००४ रोजी योजना पूर्ण होवून सिंचन व्यवस्थापनासाठी हस्तांतरीत झाली आहे, त्यामुळे चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) या योजनेद्वारे सन २००४-०५ पासून सिंचन क्षेत्रास पाणी देण्यास सुरुवात झालेली आहे. सन २००५-०६ मध्ये ९ हेक्टर, सन २००७-०८ मध्ये २२० हेक्टर, सन २००८-०९ मध्ये ३१३ हेक्टर, सन २०१०-११ मध्ये ५९१ हेक्टर व सन २०११-१२ मध्ये ४६९ हेक्टर सिंचन झाले आहे. सदर योजना नादुरुस्त असल्याने तसेच थकित विद्युत देयके व यांत्रिकी /विद्युत उपकरणाची दुरुस्ती या कारणामुळे ही योजना वर्ष २०१२-१३ पासून बंद असून सदर दुरुस्तीसाठी एकूण रु.७४५.९३ लक्ष निधीची आवश्यकता असून, निम्न तेरणा उपसा सिंचन योजना टप्पा क्र.१ ते ५ चे विशेष दुरुस्ती व विस्तार सुधारणा या लेखाशीर्षांतर्गत यांत्रिकी,विद्युत व स्थापत्य घटक दुरुस्तीचा प्रस्ताव राज्य तांत्रिक सल्लागार समिती, मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक या कार्यालयास सादर करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे चहुत्रे (ता.पारोळा, जि.जळगांव) व खडके (ता.एरंडोल, जि.जळगांव) येथे मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत कामे निकृष्ट दर्जाची झाल्याबाबत**

**(१५) ९३२२६ (१९-०८-२०१७). डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे चहुत्रे ता.पारोळा व खडके (ता.एरंडोल, जि.जळगांव) येथे मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत कामे निकृष्ट दर्जाची झाल्याबाबतची तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक २१ मे, २०१७ रोजी लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे व चौकशीत काय आढळून आले आहे,

(३) असल्यास, चौकशीनुसार रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे करणाऱ्या दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३०-०७-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) याबाबत राज्य गुणवत्ता निरीक्षक यांनी चौकशी केली असून चौकशीत सदर काम चांगल्या दर्जाचे व गुणवत्तेचे असल्याचा त्यांनी शेरा दिला आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मेटीखेडा ते शिवपूरी (ता.कळंब, जि.यवतमाळ) या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(१६) ९४१७२ (१९-०८-२०१७). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेटीखेडा ते शिवपूरी (ता.कळंब, जि.यवतमाळ) या रस्त्याच्या रुंदीकरणाचे व डांबरीकरणाचे काम करण्यात आल्याचे दिनांक १२ जुन, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याचे काम कंत्राटदाराने संबंधित अधिकाऱ्यांच्या संगनमताने निकृष्ट दर्जाचे केले असून रस्त्याच्या कडेला टाकलेली माती व मुरुम पावसाने वाहून गेले तसेच रस्त्याच्या बाजुच्या शेताजवळ नाली खोदल्यामुळे शेतक-याच्या शेतीचे नुकसान झाले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार सदर रस्त्याचे निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या कंत्राटदार व अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३०-०७-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुख्यमंत्री ग्रामीण रस्ते कार्यक्रमांतर्गत रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयातील ग्रामीण रस्त्यांची दर्जोन्नती करण्याबाबत**

**(१७) ९४८३२ (२७-१०-२०१७). श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुख्यमंत्री ग्रामीण रस्ते कार्यक्रमांतर्गत राज्यातील ३०,००० कि.मी. ग्रामीण रस्त्यांची दर्जोन्नती करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कार्यक्रमाचे थोडक्यात स्वरूप काय आहे व आतापर्यंत किती कि.मी. रस्त्यांची दर्जोन्नती करण्यात आली वा येत आहे,

(३) तसेच सदरहू कार्यक्रमांतर्गत सन २०१७-१८ मध्ये रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयातील कोणकोणत्या ग्रामीण रस्त्यांची दर्जोन्नती करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३०-०७-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) महाराष्ट्र राज्यातील न जोडलेल्या वाडया-वस्त्या जोडणे व ग्रामीण भागातील दुरवस्था झालेल्या रस्त्यांची दर्जोन्नती करणे हे मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेचे स्वरुप आहे. आतापर्यंत एकुण १६१४ कि.मी. लांबीचे रस्ते पुर्ण झाले असुन ७६०० कि.मी. लांबीचे रस्ते प्रगतीपथावर आहेत.

(३) मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत सन २०१७-१८ मध्ये रत्नागिरी जिल्हयातील १५७ कि.मी. व सिंधुदुर्ग जिल्हयातील ११२ कि.मी. चे रस्ते पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पानगाव (ता.रेणापूर, जि.लातूर) येथील चैत्यनगरीसाठी निधी देण्याबाबत**

**(१८) ९५१३१ (२६-१२-२०१७). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पानगाव (ता.रेणापूर,जि.लातूर) येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अस्थी जतन करण्यात आल्या असून दलित बांधवांचे श्रध्दास्थान असणाऱ्या या ठिकाणी पर्यटन विभागाच्या निधीतून चैत्यनगरी विकसित करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चैत्यनगरीच्या विकासासाठी आर्थिक तरतूद असतानाही पुरेसा निधी दिला जात नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पानगाव येथील चैत्यनगरीच्या विकासासाठी पुरेशा निधीची तरतूद करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (३०-०७-२०१८) :** (१) होय.

(२) नाही.

(३) व (४) मौजे पानगाव, ता.रेणापूर, जि.लातूर येथील चैत्यभूमी परिसर विकासासाठी पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग शासन निर्णय क्र.प्रस्ताव-२०१५/६/प्र.क्र.५२१/पर्यटन, दि.३१/१२/२०१५ अन्वये रू.४७२.४४ लक्षच्या कामांना प्रशासकीय मान्यता देऊन सदर स्थळाच्या विकासासाठी आतापर्यंत रू.२२२.४४ लक्ष निधी वितरीत करण्यात आला आहे.

---

## विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाने बांधकामाधीन ३१४ प्रकल्पांपैकी ४८ प्रकल्प पूर्ण करण्याच्या नियोजनाबाबत

**(१९) ९५८७६ (२६-१२-२०१७). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाने २०१७-१८ या वर्षात बांधकामाधीन ३१४ प्रकल्पांपैकी ४८ प्रकल्प पूर्ण करण्याचे नियोजन केले असल्याचे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील प्रकल्पाची कामे पूर्ण करण्यासाठी अधिकारी व कर्मचारी कार्यालयात वेळेत उपस्थित रहात नसल्यामुळे कार्यालयीन कामकाज प्रलंबित राहत आहेत तसेच बहुतांश अधिकारी, कर्मचारी हे मुख्यालयाच्या जवळपासच्या शहरांमधून कामावर येतात आणि तेथूनच देखरेख करत असल्यामुळे महत्त्वाच्या कामाचा वेळ ये-जा करण्यात वाया जात असल्याने नियोजित बांधकामास विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१७-०९-२०१८) :** (१) होय.

(२) ४८ प्रकल्प पूर्ण करण्यास भूसंपादन, पुनर्वसन, सुधारित प्रशासकीय मान्यता इत्यादी कारणांमुळे विलंब होत आहे. तथापी २३ प्रकल्प जून, २०१८ अखेर पूर्ण करावयाचे नियोजन आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नांदगाव खंडेश्वर व चांदुर रेल्वे (जि.अमरावती) पंचायत समिती नविन प्रशासकीय इमारतीमध्ये नविन फर्निचर देण्याबाबत

**(२०) ९६९९८ (०३-०१-२०१८). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.रणजीत कांबळे (देवळी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील नांदगाव खंडेश्वर व चांदुर रेल्वे पंचायत समिती नविन प्रशासकीय इमारतीमध्ये नविन फर्निचर देणेबाबतच्या प्रस्तावास निधीसह मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव अवर सचिव ग्रामविकास यांचेकडे दिनांक २२ एप्रिल, २०१६ व दिनांक ६ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास सादर केला असुन स्थानिक लोकप्रतिनिधींनी प्रस्तावास निधीसह मंजुरी देण्यासंबंधी मा. ग्रामविकास मंत्री यांना दिनांक २७ जुन, २०१७ रोजी प्रधान सचिव, ग्रामविकास यांना दिनांक १७ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास लेखी कळविण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दोन्ही पंचायत समितीच्या नविन प्रशासकीय इमारतीमध्ये फर्निचर व्यवस्था करण्याबाबतच्या प्रस्तावास निधीसह मंजुरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३०-०७-२०१८) :** (१) होय.

(२) पंचायत समिती चांदुररेल्वे (जि.अमरावती) प्रशासकीय इमारतीच्या ठिकाणी अंतर्गत फर्निचर सुविधेच्या कामास शासन निर्णय दिनांक ०२.०२.२०१८ नुसार रु. २७.७२ लक्ष इतक्या रक्कमेची प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

पंचायत समिती नांदगाव खंडेश्वर (जि.अमरावती) या नवीन प्रशासकीय इमारतीसाठी फर्निचर सुविधेच्या कामास निधीच्या उपलब्धतेनुसार व कामाच्या प्राधान्यक्रमानुसार मंजूरी देण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बेंबळा सिंचन प्रकल्पाकरीता भुसंपादीत केलेल्या प्रकल्पग्रस्ताच्या समस्याबाबत

**(२१) १००६८७ (२६-१२-२०१७). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बेंबळा सिंचन प्रकल्प (ता.बाभुळगांव, जि.यवतमाळ) प्रकल्पाकरीता त्या भागातील १५ ते २० गावाच्या शेतक-यांच्या जमीनी संपादीत करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्या शेतक-यांच्या जमीनी संपादीत करण्यात आल्या ते भुमीहीन झाले त्यांना प्रकल्पग्रस्तांचे प्रमाणपत्र मिळाले परंतु त्यांना कोणत्याही विभागामध्ये नोकरी न लागल्याने वयोमर्यादा ओलांडल्याने भुमीहीन वर्गावर उपासमारीची वेळ आली असल्याची दिनांक १२ जुन, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार भुमीहीन प्रकल्पग्रस्ताच्या समस्येबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३०-०७-२०१८) :** (१) बेंबळा प्रकल्पातील धरणामुळे जलमग्न होणा-या क्षेत्रासाठी यवतमाळ जिल्हयातील २९ गावांची व अमरावती जिल्हयातील १३ गावांची एकुण १०,३८२.०४ हे. आर जमीन संपादित केली आहे.
(२) हे खरे नाही. सामान्य प्रशासन विभाग दिनांक २७/१०/२००९ च्या निर्णयानुसार प्रकल्पग्रस्तांच्या नेमणुका जाहीरात देवून संबंधित पात्रता तपासून स्पर्धा परीक्षेद्वारे गुणवत्तेनुसार करण्यात आल्या आहेत. सदर शासन निर्णयापूर्वी २३७० पैकी ८५ प्रकल्पग्रस्तांना नोक-या देण्यात आल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## खोपी ते शिरगांव (ता.खेड,जि.रत्नागिरी ) या रस्त्याच्या कामास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत

**(२२) १०४०४३ (२१-१२-२०१७). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खोपी ते शिरगांव (ता.खेड, जि.रत्नागिरी) या रस्त्याच्या मजबुतीकरण व डांबरीकरणाच्या कामास अद्याप प्रशासकीय मान्यता देण्यात आली नाही आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरच्या कामास प्रशासकीय मंजूरी देऊन तातडीने काम सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३०-०७-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे
(२) शासनाच्या प्रचलित धोरणानुसार मा.पालकमंत्री जि.रत्नागिरी यांच्या अध्यक्षतेखालील समितीने खोपी ते शिरगाव (ता.खेड, जि.रत्नागिरी) या रस्त्यास मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत दर्जोन्नत करण्यासाठी मंजूरी दिली असून सदर रस्त्याचे अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**निवृत्तीवेतन धारकांना निवृत्तीवेतन वेळेवर मिळण्याबाबत**

**(२३) १०४७४६ (०९-०२-२०१८). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बँकेशी व्यवहार करताना निवृत्तीवेतन धारकांना आधार कार्डशी बोटांचे ठसे जुळणे आवश्यक आहे परंतु राज्यातील अनेक निवृत्तीवेतन वयोमानामुळे धारकांचे बोटांचे ठसे, डोळ्यांची बाहुली जुळत नसल्यामुळे त्यांना निवृत्तीवेतन मिळण्यास अडचणी येत असल्याचे दिनांक ३० डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार निवृत्तीवेतन धारकांना निवृत्तीवेतन वेळेवर मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२३-०८-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

अशावेळी इतर पारंपारिक मार्गाने हयातीचा दाखला घेऊन निवृत्तीवेतन अदा करण्यात येते.

(२) विलंब झाला नसल्याने प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जळगाव जिल्हा परिषदेचा कृषी विभागात प्रमुख पदे तसेच**
**वर्ग ३ व ४ ची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(२४) १०५०११ (०१-०४-२०१८). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्हा परिषदेचा कृषी विभाग व राज्य शासन अंतर्गत कार्यरत कृषी विभागात प्रमुख पदे तसेच वर्ग ३ व ४ ची पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२७-०८-२०१८) :** (१) व (२) अंशत: खरे आहे,

जळगाव जिल्हा परिषदेच्या कृषी विभागात कृषि विकास अधिकारी गट-अ या संवर्गात १ पद मंजूर असून सदरचे पद भरलेले आहे.

गट-ब संवर्गात जिल्हा कृषि अधिकारी (सामान्य), जिल्हा कृषि अधिकारी (विघयो) व मोहिम अधिकारी अशी ३ पदे मंजूर असून तीनही पदे रिक्त आहेत.

गट-क संवर्गात कृषि अधिकारी यांची २७ पदे मंजूर असून २५ पदे भरलेली आहेत व २ पदे रिक्त आहेत, तसेच विस्तार अधिकारी (कृषि) ही ४० पदे मंजूर असून ३३ पदे भरलेली आहेत व ७ पदे रिक्त आहेत.

गट-ड संवर्गात कोणतेही पद रिक्त नाही.

(३) राज्यातील सर्व जिल्हा परिषदांतर्गत नामनिर्देशनाच्या कोटयातील गट-क संवर्गातील रिक्त पदे भरण्यासाठी ऑनलाईन परीक्षा प्रक्रिया राबविण्याबाबत दि. २४ ऑगष्ट, २०१७ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला असून शासनस्तरावरुन एकत्रित पदभरतीची कार्यवाही सुरु आहे. तसेच वेळोवेळी पदोन्नती समितीच्या बैठका आयोजित करुन पदोन्नतीच्या कोटयातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गोसेखुर्द या राष्ट्रीय प्रकल्पाचे भूमिपूजन करून भूमी संपादन कायदयानुसार ८५ गावे आणि १८२ शेतशिवारे अल्प मोबदल्यात संपादित करण्यात आल्याबाबत**

**(२५) १०६५३७ (१०-०४-२०१८). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोसेखुर्द या राष्ट्रीय प्रकल्पाचे सन १९८८ मध्ये भूमिपूजन करून भूमी संपादन कायदा १८९४ नुसार ८५ गावे आणि १८२ शेतशिवारे अल्प मोबदल्यात संपादित करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भू संपादन महाराष्ट्र प्रकल्प बाधितांचे पुनर्वसन अधिनियम १९९९ मधील कलम २ मधील पोटकलम २ अन्वये प्रकल्पबाधित व्यक्तीच्या व्याख्येला डावलुन दिल्यामुळे आणि वाढीव कुटुंबाकरिता १९/८/२०१५ च्या शासन निर्णयाद्वारे प्रकल्पबाधित लाभार्थ्यांकरिता सन १९९७ पूर्वी लग्न झाले असल्याची अट असल्याने एकूण प्रकल्पग्रस्तांच्या ५० टक्के प्रकल्पग्रस्त शासनाच्या सोयी सवलती व हक्कांपासून वंचित राहिले असून याच अधिनियमाखाली कलम १० मधिल पोटकलम ३ अन्वये नमूद केलेल्या नागरी सुविधा नवीन गावठाणा वरती करण्याबाबत तरतूद असूनही यात अनियमितता झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत वेळोवेळी शासनाकडे संपूर्ण पुनर्वसनाची मागणी करूनही कोणतीच कारवाई होत नसल्याने दिनांक १९ फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास आंदोलन करण्याचा लेखी इशारा मा.मुख्यमंत्री यांना दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार प्रकल्पबाधितांच्या संपूर्ण पुनर्वसनाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३०-०७-२०१८)** : (१) नाही. गोसीखुर्द या राष्ट्रीय प्रकल्पाचे सन १९८८ मध्ये भूमीपूजन झाले आहे. प्रकल्पासाठी आवश्यक जमिनीचे भूसंपादन प्रचलित कायद्यातील तरतुदी व नियमानुसार मोबदला अदा करुन करण्यात आले आहे.

(२) नाही.

शासनाने दि.१८.६.२०१३ चे शासन निर्णयानुसार गोसीखुर्द प्रकल्पासाठी पुनर्वसन पॅकेज अंतर्गत मंजुर केलेल्या रू.१२०० कोटी रकमेपैकी नागपूर व भंडारा जिल्ह्यातील प्रकल्पग्रस्तांना अनुक्रमे रु.५२५.९५ कोटी व रु.३२५.४१ कोटी रक्कमेचे भुगतान उपजिल्हाधिकारी (भुसंपादन) नागपुर/भंडारा यांचे मार्फत करण्यात आले असुन उर्वरीत रक्कमेचे वाटप प्रगतीत आहे. महाराष्ट्र प्रकल्प बाधितांचे पुनर्वसन करतांना अधिनियम १९९९ चे कलम २ मधील पोटकलम २ ची अंमलबजावणी करण्यात आली आहे. गोसीखुर्द प्रकल्पग्रस्तांना शासन निर्णय क्र.आर.पी.ए.०२१०/ प्र.क्र.६९(भाग-२)/ र-१/ दि. १८/६/२०१३ नुसार विशेष आर्थिक पॅकेजचा लाभ प्रदान करण्यात आलेला आहे. सदर पॅकेज मध्ये अंतर्भुत असलेल्या लाभापैकी प्रकल्पग्रस्तांना नौकरीऐवजी एकमुस्त रक्कम २.९० लक्ष प्रति कुंटुब देण्यात येत आहे. शासन निर्णय १९/८/२०१५ नुसार कुटुंबाच्या नावावर एकापेक्षा अधिक घरे/ मालमत्ता व एका घरावर एकापेक्षा जास्त कुटुंबाची नावे तसेच निवाडयानुसार रिक्त भुखंड दर्शविण्यात आले असल्यास त्यापैकी कोणत्याही कुटुंबाला पॅकेजचा लाभ देण्यात आलेला नाही, अश्या प्रकल्पग्रस्तांना शासन निर्णय १९/८/२०१५ नुसार नोकरी ऐवजी एकमुस्त २.९० लक्ष चा लाभ १३ (१) ची अधिसुचना दि.२१/३/१९९७ चा दिनांक गृहीत धरुन प्रदान करण्यात आलेला आहे. सदरील शासन निर्णयानुसार २२/०२/२०१८ पर्यंत एकुण पात्र २७२७ कुटुंबापैकी २६४१ कुटुंबीयांना ७६.५८ कोटी रकमेचे वाटप करण्यात आलेले आहे. उर्वरीत ८६ कुटुंबाना मोबदला देण्याची कार्यवाही सुरु आहे. उक्त अधिनियमाचे कलम १० मधील पोटकलम ३ नुसार १८ नागरी सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत असुन यात अनियमितता झालेली नाही.

(३) होय.

(४) मा.पालकमंत्री नागपूर व भंडारा यांनी मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांनी अनुक्रमे जिल्हा स्तरावर व राज्यस्तर प्रकल्पग्रस्ताचे प्रतिनिधीसमवेत बैठक घेवून अनेक प्रश्नांबाबत निर्णय घेतले आहेत व त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील जिल्हा परिषदेमधील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(२६) १०७५९४ (२८-०३-२०१८). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हा परिषदांमध्ये जवळपास ४० टक्के पदे रिक्त असल्याने कर्मचा-यांवर कामाचा मोठा ताण पडत असुन शासन अजुनही कर्मचारी कपात करणार असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०४-०८-२०१८) :** (१) हे अंशतः खरे आहे.

वित्त विभागाने दिनांक २९ जून, २०१७ च्या शासन निर्णयान्वये सध्या मंजूर असलेल्या पदांमध्ये ३०% पदे कपात करण्याबाबतच्या सूचना दिल्या आहेत.

(२) व (३) शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक-पदनि-२०१६/प्र.क्र.३०/२०१६/आ.पु.कक्ष, दिनांक २५ मे, २०१७ अन्वये "जे प्रशासकीय विभाग आकृतीबंध अंतिम मंजूर करुन घेणार नाहीत तोपर्यंत त्या विभागांना नवीन पदनिर्मिती तसेच पदभरती करण्यात येणार नाही अशी अट वित्त विभागाने घातली होती". तथापि, वित्त विभागाने दिनांक १६ मे, २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये पदभरतीवर घालण्यात आलेली अट वगळली असून सरळसेवेच्या रिक्त असलेल्या पदांच्या १००% भरतीसाठी प्रशासकीय विभागांना जुन्या आकृतीबंधानुसार पदभरतीची अनुमती देण्यात आलेली आहे.

जिल्हा परिषदांमधील गट-क व गट-ड संवर्गातील सरळसेवेच्या कोटयातील रिक्त पदे भरण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाने दिनांक १३ जून, २०१८ च्या शासन निर्णयान्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत. त्यानुसार राज्यातील सर्व जिल्हा परिषदांमधील पदभरतीची कार्यवाही सुरु आहे.

---

**पाटण (जि.सातारा) विधानसभा मतदारसंघातील गावांना व वाड्यांना स्वतंत्र ग्रामपंचायतींचा दर्जा देण्याबाबत**

**(२७) १०८७७० (०५-०४-२०१८). श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाटण (जि.सातारा) तालुक्यातील डोंगरी व दुर्गम भागात सध्या तीन ते चार गावे तसेच वाडयां वस्त्यांची मिळून एक ग्रुप ग्रामपंचायत असल्याने या गावातील तसेच वाडयां वस्त्यातील ग्रामस्थांना कार्यालयीन काम करताना अनेक अडचणी येत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाटण तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायती असणाऱ्या गावांना व वाडयां वस्त्यांना स्वतंत्र ग्रामपंचायतींचा दर्जा ग्रामविकास विभागामार्फत मिळावा याकरिता मा.ग्रामविकास मंत्री यांचेकडे दिनांक ११ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्रव्यवहार केला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामध्ये पाटण तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत कुसवडे मधून पळासरी, रामेल व वन अशी एक व शिद्रुकवाडी (खळे), शिद्रुकवाडी (काढणे), शिद्रुकवाडी (कोरीवळे) अशी एक शिद्रुकवाडी ग्रामपंचायत तसेच नाणेगाव बुद्रुक (माजगांव पुनर्वसित गावठाण), बामनेवाडी

विजयनगर, जिमनवाडी मिळून बामनेवाडी विजयनगर अशी एक आणि शिवन्देश्वर ग्रामपंचायतीमधून वेगळी करून किसरुळे अशी ग्रामपंचायत अश्या पाच गावांनी व वाड्यावस्त्यांनी स्वतंत्र ग्रामपंचायतींचा दर्जा गावांना मिळणेकरिता सविस्तर प्रस्ताव हा जिल्हा परिषद, सातारा यांचेकडे सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त गावांना स्वतंत्र ग्रामपंचायतींचा दर्जा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३०-०७-२०१८) :** (१) सातारा जिल्हयातील पाटण तालुक्यात दुर्गम व डोंगरी भागातील तीन ते चार गावे तसेच वाडया वस्त्या मिळून एकूण ७० इतक्या ग्रुप ग्रामपंचायती अस्तित्वात असून ६८ ग्रुप ग्रामपंचायतीसाठी नियमित ग्रामसेवक कार्यरत आहेत. २ ग्रुप ग्रामपंचायतींचा अतिरिक्त कार्यभार २ ग्रामसेवकांकडे देण्यात आला असून त्यांचेमार्फत या सर्व ग्रुप ग्रामपंचायतींचे कार्यालयीन कामकाज केले जाते.
(२) होय, पाटण विधानसभा मतदारसंघातील गावांना व वाडयांना स्वतंत्र ग्रामपंचायतींचा दर्जा देण्याबाबत दि.११.०९.२०१५ रोजीच्या पत्रान्वये मा.मंत्री (ग्रामविकास) यांना लोकप्रतिनिधींनी विनंती केलेली आहे.
(३) व (४) ग्रुप ग्रामपंचायत कुसवडे अंतर्गत समाविष्ठ पळासरी, रामेल व वन या गावांची सन २०११ चे जनगणनेनुसार एकूण लोकसंख्या ८८२ इतकी असून ही गावे पुनर्वसित नाहीत.

शिद्रुकवाडी (खळे) या वाडीची लोकसंख्या ११०, शिद्रुकवाडी (काढणे) लोकसंख्या २०० व शिद्रुकवाडी (कोरीवळे) या वाडीची लोकसंख्या १३५ इतकी आहे. या तीनही वाडयांची एकूण लोकसंख्या ४६५ असून ही गावे पुनर्वसित नाहीत.

त्यामुळे शासन निर्णय दि. १२ फेब्रुवारी, २००४ व दि.०४ मार्च, २०१४ नुसार निकषांची पूर्तता होत नसल्याने सदर ठिकाणी स्वतंत्र ग्रामपंचायती स्थापन करण्याचे प्रस्ताव सादर करता येत नाही.

उत्तरमांड प्रकल्पांतर्गत बाधित असलेल्या मौजे नाणगाव बुद्रुक (माजगाव पुनर्वसित गावठाण) या नावाने स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्याबाबत दि.२३.०६.२०१७ रोजीच्या पत्रान्वये गट विकास अधिकारी, पंचायत समिती पाटण यांना कळविण्यात आले आहे.

बामणेवाडी विजयनगर व जिमनवाडी मिळून बामणेवाडी विजयनगर अशी स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हा परिषदेस प्राप्त झाला आहे.

कोयना धरण प्रकल्पांतर्गत बाधित असलेल्या मौजे किसरुळे, करंजवडे, माळुंगे, नहिंबे, किसरुळे (भराडे वस्ती) व किसरुळे (माने वस्ती) या वस्त्या मौजे शिवंदेश्वर ग्रामपंचायतीमध्ये समाविष्ठ आहेत. किसरुळे हे गाव सद्या शिवंदेश्वर ग्रामपंचायतीमध्ये समाविष्ठ असून किसरुळे या गावास महसुली गावाचा दर्जा प्राप्त नाही.

ग्रामपंचायत स्थापन करताना शासन स्तरावर केवळ महसुली गाव या घटकाचा विचार करण्यात येतो. ज्या ठिकाणी स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करावयाची आहे ते क्षेत्र महाराष्ट्र

जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या कलम ४ (१) नुसार स्वतंत्र महसुली गाव म्हणून जाहिर झालेले असले पाहिजे असा निकष असल्याने सदरचा प्रस्ताव सादर करता येत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे पिंपळखुटे (ता.माढा, जि.सोलापूर) गावाचा सिना-माढा उपसा सिंचन योजनेच्या कार्यक्षेत्रामध्ये समावेश करण्याबाबत**

**(२८) १०९००५ (१०-०४-२०१८). श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे पिंपळखुटे (ता.माढा, जि.सोलापूर) गावाचा सिना-माढा उपसा सिंचन योजनेच्या कार्यक्षेत्रामध्ये समावेश करावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.जलसंपदा मंत्री यांचेकडे दिनांक ३० मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनातील मागणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३१-०८-२०१८) :** (१) होय.
(२) सीना-माढा उपसा सिंचन योजनेचा पाणी वापर ४.७५ अ.घ.फू. असून माढा तालुक्यातील १६१५० हेक्टर (ICA) क्षेत्रास सिंचनाचा लाभ देण्याची मंजूर प्रकल्प अहवालात तरतूद आहे. सदर मौजे पिंपळखुंटे, ता. माढा या भागातील मागणीच्या क्षेत्राचा मंजूर प्रकल्प अहवालामध्ये अंतर्भाव नाही.

याबाबत मा. राज्यमंत्री (जलसंपदा) यांच्या अध्यक्षेतखाली दि.०७/११/२०१७ रोजी संपन्न झालेल्या बैठकीमध्ये खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे:-

सीना-माढा उपसा सिंचन योजनेवर PDN करुन ठिबक सिंचनाद्वारे पाण्याची बचत होत असल्यास, सदर बचतीचे पाण्यातून मौजे पिंपळखुटे, ता.माढा या गावांचा लाभक्षेत्रात समावेश करणेबाबत रितसर कार्यवाहीचा प्रस्ताव शासनास सादर करावा.
सद्य:स्थितीत PDN अंतर्गत निविदा कार्यवाही क्षेत्रीयस्तरावर प्रगतीपथावर आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र तेलंगणा आंध्रप्रदेश यांच्या संयुक्त कराराने सुरु असलेला लेंडी प्रकल्प प्रलंबित असल्याबाबत**

**(२९) १०९१३८ (२८-०३-२०१८). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

वि.स. ४७७ (22)

(१) महाराष्ट्र तेलंगणा आंध्रप्रदेश यांच्या संयुक्त कराराने सुरु असलेला लेंडी प्रकल्प गेल्या ३० वर्षापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तसेच येथील धरणग्रस्त शेतक-यांना ३० वर्षापूर्वी मिळालेला शेतीचा मोबदला कमी प्रमाणात असल्याने नवीन धोरणानुसार शेतीचा मोबदला मिळावा अशी शेतकऱ्यांची मागणी आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीनुसार प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रातील धरणग्रस्त शेतक-यांना नवीन धोरणानुसार मोबदला देवून तात्काळ धरण पुर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०४-०८-२०१८) :** (१) होय.

(२) हे खरे आहे.

शासनाच्या नवीन धोरणानुसार शेतीचा मोबदला मिळावा व इतर मागण्यासंदर्भात शेतकऱ्यांनी त्यांचे निवेदन दिनांक ०१/०७/२०१४ नुसार मागणी केलेली आहे. तसेच वाढीव मोबदला संदर्भात काही प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी मा. उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद यांचेकडे रिट याचिका दाखल केल्या आहेत.

(३) लेंडी प्रधान प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात येणारे एकूण १९ गावांच्या २३३१ हेक्टर क्षेत्राचा संपादन कार्यवाहीसह शेतजमीनीचा मावेजा सन १९९९ ते २००५ दरम्यान वाटप करण्यात आला आहे.

प्रकल्पांतर्गत सन १९९९ ते २००५ दरम्यान भुसंपादन करताना भुसंपादन अधिनियम १८९४ नुसार प्रचलीत तत्कालीन शासन नियमावली, तत्कालीन शिघ्र सिद्ध गणक व संपादन केलेल्या गावठाणामधील खरेदी विक्री व्यवहार यांची पडताळणी करुनच महसुल विभागामार्फत दर निश्चीत करुन अंतीम निवाडे जाहिर करण्यात आलेले आहेत. त्यानंतर प्रकल्पग्रस्त शेतक-यांना मोबदला वाटप केला आहे.त्यामुळे या प्रकरणामध्ये नवीन भुसंपादन कायदानुसार मोबदला देता येणार नाही.

भुसंपादन अधिनियम १८९४ नुसार लेंडी प्रकल्पाकरिता २८२२.२२ हेक्टर जमीन संपादित केलेली असुन ३७.८६ हेक्टर जमिन ही नविन भुसंपादन अधिनियम कायदा व खाजगी वाटाघाटीने संपादित केलेली आहे.

सन २०१३ पुर्वीच्या निवाड्या प्रकरणी काही शेतकऱ्यांनी मा. न्यायालयात दाखल केलेल्या रिट याचिकेच्या अनुषंगाने मा. न्यायालयाचे आदेश प्राप्त झाल्यानंतर त्यानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

प्रकल्पाचे कंदर भरणीसह उर्वरित कामे पुर्ण करण्याबाबत तीन वर्षाचे नियोजन असून प्राप्त होणाऱ्या निधीतून कामे प्रगतीपथावर आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चिखली व देऊळगाव राजा (जि.बुलढाणा) येथील खडकपूर्णा प्रकल्पबाधित शेतक-यांना त्यांच्या जमिनीचा वाढीव मोबदला मिळणेबाबत**

**(३०) १०९२०३ (१३-०४-२०१८). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमित झनक (रिसोड), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयातील चिखली व देऊळगाव राजा येथील शेतक-यांना खडकपूर्णा प्रकल्पबाधित शेतक-यांची पाण्यात गेलेल्या जमिनीचा वाढीव मोबदला मिळावा अशी मागणी केली जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने येथील ६० शेतक-यांनी सानुग्रह अनुदान घेवूनही कलम १८ व २८ अंतर्गत मोबदला दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ३१७ पेक्षा अधिक शेतक-यांना कायद्याचे कारण देवून अधिकाऱ्यांनी लाभापासून वंचित ठेवले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन सदरील वंचित शेतक-यांना कलम १८ व २८ अंतर्गत मोबदला देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२९-०८-२०१८) :** (१) होय.

(२) नाही. सानुग्रह अनुदान व पुनर्वसन अनुदान या दोन्ही बाबी भिन्न असून या प्रकल्पांतर्गत फक्त १४ कास्तकारांनी पुनर्वसन अनुदान घेऊनही कलम १८ अंतर्गत मा.दिवाणी न्यायालयात दावे दाखल करुन दिवाणी न्यायालयाचे निकालानुसार रकमेची उचल केली आहे.

(३) पुनर्वसन अनुदान घेतल्यानंतर कलम-२८ अ अन्वये दाखल केलेले एकूण ३०९ दावे हे मोबदल्यास पात्र नसल्याने उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी सिंदखेड राजा, जि.बुलडाणा यांनी खारीज केले आहेत.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गडचिरोली जिल्हयातील ग्रामपंचायतींचे विभाजन करून नवीन ग्रामपंचायती निर्माण करण्याबाबत**

**(३१) १०९२९० (२८-०३-२०१८). डॉ.देवराव होळी (गडचिरोली), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.राजेश काशीवार (साकोली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्हा विस्ताराने फार लांब असून जिल्हयात १६८८ हून अधिक गावे आहेत मात्र १६८८ या गांवापैकी फक्त ४६७ ग्रामपंचायती आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एका ग्रापंचायतीमध्ये ४ ते ५ गावे असणारी असंख्य ग्रामपंचायती असल्याने अशा गावांचा विकास होण्यास अडथळा निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार ग्रापंचायतींचे विभाजन करून नवीन ग्रामपंचायतींची निर्मिती करण्याबाबत शासनान कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३०-०७-२०१८) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

गडचिरोली जिल्ह्यामध्ये एकूण १६८८ गावे असून यामध्ये ४६७ ग्रामपंचायती अस्तित्वात होत्या, परंतु ११ ग्रामपंचायती हया नगरपंचायतीमध्ये रुपांतरण करण्यात आल्याने सध्या ४५६ ग्रामपंचायती अस्तित्वात आहेत.

जिल्हयात १०२ स्वतंत्र व ३५४ गट ग्रामपंचायती असून गट ग्रामपंचायत असलेल्या ग्रामपंचायतीचे मुख्यालय व अंतर्भूत गावातील अंतर ५ कि.मी. किंवा काही ठिकाणी ५ कि.मी. पेक्षा अधिक आहे. गडचिरोली जिल्हा हा नक्षलग्रस्त व ८०% जंगलव्याप्त असल्याने शासकीय योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करताना अडचणी निर्माण होतात.
(३) व (४) स्वतंत्र ग्रामपंचायती स्थापन करण्याच्या अनुषंगाने दि.१२ फेब्रुवारी, २००४ रोजीच्या शासन निर्णयातील निकषांनुसार प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना संबंधितांना देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार जिल्हा परिषदेकडून विभागीय आयुक्तांमार्फत शासनास प्रस्ताव सादर करण्याकरीता सध्या ग्रामपंचायत विभाजनाच्या एकूण ३६ प्रस्तावास जिल्हा परिषद स्थायी समितीच्या सभेत मान्यता घेण्यात आली आहे.

---

**प्रधानमंत्री ग्रामसडक योजना व मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या कामाबाबत**

**(३२) १०९४९६ (०५-०४-२०१८). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) प्रधानमंत्री ग्रामसडक योजना व मुख्यमंत्री ग्रामसडक योजना या योजनेअंतर्गत राज्यात विविध ठिकाणी रस्त्याची कामे झाली असून बऱ्याच ठिकाणी ही कामे सुरु आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, काही ठिकाणी रस्त्याची कामे निकृष्ट दर्जाची होत असून त्यामुळे शासनाचा निधी वाया जात आहे अशा तक्रारी आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास,त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३०-०७-२०१८) :** (१) व (२) होय, अंशत: खरे आहे.

(३) व (४) प्रधानमंत्री ग्राम सडक योजनांतर्गत एकूण ३८ तक्रारी प्राप्त झाल्या असून १ तकारीमध्ये अंशत: तथ्य आढळलेले असून सदर त्रुटी पुर्तता अहवाल सादर केला आहे. २१ तक्रारींत साधारण त्रुटी निदर्शनास आल्या असून १६ तक्रारींची चौकशी प्रगतीत आहे.

मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत एकूण ९ तक्रारी प्राप्त झाल्या असून त्यापैकी ५ तक्रारींमध्ये तथ्य नाही. ऊर्वरीत ४ तक्रारींपैकी २ तक्रारीत तथ्य आढळून आले असून २ तक्रारींची चौकशी प्रगतीत आहे. तथ्य आढळलेल्या व तांत्रिक सुधारणा आवश्यक असलेल्या तक्रारींसंबंधी आवश्यक कार्यवाही करण्याबाबत संबंधित अधिक्षक अभियंता यांना निर्देश देण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महाड तालुक्यातील (जि.रायगड) महाड-विन्हेरे मार्गावरील आंबिवली फाटा येथून नाडगाव तर्फे तुडील मार्गे रावढळ जाणा-या मार्गाची झालेली दुरवस्था**

**(३३) १०९९५९ (०९-०४-२०१८). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड-विन्हेरे (ता.महाड, जि.रायगड) मार्गावरील आंबिवली फाटा येथून नाडगाव तर्फे तुडील मार्गे रावढळ येथे जाणा-या मार्गाची दुरवस्था झाल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आंबिवली फाटा ते रावढळ या रस्त्यात खडडे पडल्याने हा रस्ता वाहतूकीस अत्यंत धोक्याचा झाल्याने रस्त्याच्या दुरुस्तीची मागणी करुनही संबंधित विभागाकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात येत आहे, हे खेर आहे काय,

(३)असल्यास, सदर रस्त्याची शासनाने पाहणी केली आहे काय व त्यानुसार उक्त रस्त्याच्या दुरुस्तीकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३०-०७-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) सदर रस्ता अतिवृष्टीमुळे खराब झाला होता. तथापि, प्रधानमंत्री ग्राम सडक योजनांतर्गत विभागीय देखभाल दुरुस्ती अंतर्गत माहे जानेवारी २०१८ अखेर सदर रस्त्यावरील खड्डे डांबर मिश्रित खडीने भरून घेण्यात आले असून वाहतूक सुरळीत सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नाशिक जिल्हयातील केळझर धरणातील चारी क्र. ८ च्या कामाला प्रशासकीय मान्यता मिळूनही काम अद्यापही सुरु झाले नसल्याबाबत**

**(३४) ११०२४९ (१२-०४-२०१८). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील केळझर धरणाच्या निर्मितीनंतर या धरणातील जलसाठा मोठ्या प्रमाणात शेती व पिण्यासाठी आरक्षित करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या धरणातील आरक्षित पाणी शेती क्षेत्रात पोहोचण्यासाठी डाव्या कालव्याच्या विस्तारीकरणासाठी चारी क्र. ८ च्या कामाला प्रशासकीय मान्यता मिळुनही चारीचे काम अद्यापही सुरु करण्यात आले नसल्याने तेथील शेतकरी लाभ क्षेत्रापासून वंचीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार चारीचे काम तात्काळ सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३०-०८-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

केळझर मध्यम प्रकल्प हा सिंचन प्रकल्प म्हणून बांधण्यात आला आहे. तथापि परिस्थितीनुरुप पिण्यासाठी जिल्हाधिकारी नाशिक यांचेद्वारे दरवर्षी धरणातील १५% ते १६% पाणी प्रासंगिक आरक्षण म्हणून आरक्षित करण्यात येते.

(२) तापी महामंडळाच्या कार्यकक्षेत असलेल्या केळझर चारी क्र.८ ची एकूण लांबी १०.८० कि.मी. असून साखळी क्र.२८०० ते ३८०० मी मधील कामास शेतक-यांच्या विरोधामुळे काम अपूर्ण आहे.सदर चारी क्र.८ च्या विस्तारीकरणाच्या कामास द्वितीय सु.प्र.मा.ची आवश्यकता असून प्रस्ताव महामंडळाकडून राज्य तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक यांचेकडे सहमतीसाठी दि.१.६.२०१८ रोजी पाठविण्यात आला आहे. द्वितीय सु.प्र.मा.प्रस्तावास मंजूरी मिळताच निधीच्या उपलब्धतेनुसार उर्वरित कामे हाती घेण्याचे नियोजन आहे.

(३) द्वितीय प्रशासकीय मान्यतेची कार्यवाही प्रगतीत असून मान्यता प्राप्त झाल्यानंतर कामे तातडीने हाती घेण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर जिल्हयातील उजनी जलाशयात भिमा, माण व सिना या नदयांवर बॅरेजेस उभे करण्याबाबत**

**(३५) ११०५२१ (१०-०४-२०१८). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयातील उजनी जलाशयातून चालू वर्षी ४७ दिवस पाणी चालू राहून सुमारे ८९ टीएमसी पाणी वाहून गेल्यामुळे या पाण्याचा उपयोग करण्यासाठी धरणाच्या उगमापासून भिमा, माण व सिना या नदयांवर बॅरेजेस उभे करण्याची मागणी स्थानिकांकडून होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३०-०७-२०१८) :** (१) होय. तथापि प्रथम कृष्णा पाणी तंटा लवादाने भीमा नदीतून राज्यास अनुज्ञेय ठरविलेल्या पाण्याचा पूर्णपणे वापर केला असून त्यापेक्षा अधिक वापर करता येत नसल्याने पाणी वाहून गेले आहे.
(२) दि.१६/९/२०१६ रोजी मा.मंत्री (जलसंपदा) यांच्या अध्यक्षतेखाली व मा.मंत्री (सहकार) यांच्या उपस्थितीत सोलापूर जिल्ह्यातील सिंचन प्रकल्प पूर्ण करणे व इतर अनुषंगिक कामाची आढावा बैठक घेण्यात आली. यामध्ये पाणी उपलब्धततेच्या अधीन राहून प्रायोगिक तत्वावर प्रथमत: भीमा नदीवर को.प. बंधारा वडापूर व सीना नदीवर को.प. बंधारा वडकबाळ यांचे बॅरेजमध्ये रुपांतर करण्याचे संकल्पन व अंदाजपत्रक सादर करण्याविषयी सूचना देण्यात आल्या आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**निम्न तेरणा (ता.लोहारा, जि.उस्मानाबाद) उजवा कालव्यावरील पेठसांगवी, एकोंडी व कवठा येथे पूल बांधण्याबाबत**

**(३६) ११०८३१ (२८-०३-२०१८). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) निम्न तेरणा प्रकल्प, माकणी (ता.लोहारा, जि.उस्मानाबाद) येथील निम्न तेरणा उजवा कालव्यातील पेठसांगवी एकोंडी व कवठा येथे अनुक्रमे कि.मी. १२, २२ व २५ या अंतरावर आवश्यक तेथे पूल बाधण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी कार्यकारी अभियंता, निम्न तेरणा कालवा विभाग क्र.२, लातूर यांना दिनांक ०१ एप्रिल, २०१३ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाव्दारे सुचित केले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने संबंधित अधिकाऱ्यांकडून कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यामुळे या परिसरातील नागरिकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार सदर पूल बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३०-०७-२०१८) :** (१) निम्न तेरणा उजव्या कालव्याच्या अनुक्रमे कि.मी.१८, २२ व २५ मध्ये पूल बांधण्याची मागणी केली होती.
(२) व (३) निम्न तेरणा उजव्या कालव्यावरील सा.क्र.१८०१३ मी., सा.क्र.२२२७० मी. व सा.क्र.२४३९८ मी. वरील पुलांच्या कामापैकी सा.क्र.१८०१३ मी. वरील पुलाचे बांधकाम पूर्ण केले आहे.

सा.क्र. २४३९८ मी. व सा.क्र. २२२७० मी. वरील पुलांच्या कामाचा समावेश निम्न तेरणा प्रकल्पाच्या चतुर्थ सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या अंदाजपत्रकात करण्यात आलेला असून

अंदाजपत्रक राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीकडे तपासणीत आहे. निम्न तेरणा प्रकल्पाच्या चतुर्थ सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्तावास मान्यता प्राप्त झाल्यानंतर दोन पुलांचे बांधकाम हाती घेण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वाकी खापरी (ता.इगतपुरी) येथील खापरी धरण अंतर्गत भावली पुर्नवसन प्लॉट वाटपात झालेला गैरव्यवहार**

**(३७) १११२११ (१०-०४-२०१८). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाकी खापरी (ता.इगतपुरी) येथील खापरी धरण अंतर्गत भावली पुर्नवसन प्लॉट वाटपात झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी विभागीय आयुक्त नाशिक यांना दिनांक ३० डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३१-०८-२०१८) :** (१) होय.
सन्माननीय लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ३०/१२/२०१७ रोजी विभागीय आयुक्त, नाशिक यांच्या कार्यालयाकडे निवेदन दिले आहे.
(२) प्रस्तुत निवेदनाच्या अनुषंगाने कार्यकारी अभियंता, नांदूर मध्यमेश्वर प्रकल्प विभाग, नाशिक यांनी दिनांक २१/०४/२०१८ च्या पत्रान्वये उपजिल्हाधिकारी, पुनर्वसन शाखा, नाशिक, यांचेकडे निवेदनातील मुद्या क्र. १ ते ६ विषयी चौकशी अहवाल सादर केला असून, त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा भ्रष्टाचार झालेला नाही असे निर्दशनास आले आहे. याबाबत पुढील कार्यवाही महसूल विभागामार्फत होणे अपेक्षित आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**साखरपा-कोंडगाव (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) येथील धरणातून गळती होऊन हजारो लिटर पाणी वाया जात असल्याबाबत**

**(३८) १११३०५ (०४-०४-२०१८). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साखरपा-कोंडगाव (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) येथील धरणातून गळती होऊन रोज हजारो लिटर पाणी वाया जात असल्याचे माहे जानेवारी,२०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर धरणाची शासनाने पाहणी केली आहे काय  व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास,तदनुसार धरणाची दुरुस्ती करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३०-०८-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) साखरपा-कोंडगाव येथील धरणातून होणा-या गळती संदर्भात क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी पाहणी केली असून सदर पाहणीत मुख्य विमोचकाच्या डिव्हाईड वॉलमधून गळती होत असल्याचे निदर्शनास आले.

(३) धरणाच्या सुरक्षिततेसाठी तसेच भविष्यात पाण्याची तीव्र टंचाई भासू नये यादृष्टीने यांत्रिकी विभागामार्फत गेट दुरुस्तीचे व रबर सिल बसविण्याचे काम करण्यात आले आहे.

तसेच विमोचक विहिरीच्या दुरुस्तीचे अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगती पथावर आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रत्नागिरी जिल्हा नियोजन समितीमधील गेल्या आर्थिक वर्षाच्या अखर्चीत निधीबाबत**

**(३९) १११३४४ (०४-०४-२०१८). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हा नियोजन समितीने गेल्या आर्थिक वर्षासाठीचे २९ कोटी १६ लाखाची मुदत डिसेंबर २०१७ मध्ये  संपली तरी निधी खर्च झाला नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१६-१७ चे दायित्व २९ कोटी  १६ लाख आणि त्यामधील वितरित निधी २० कोटी इतका असून प्रत्यक्षात त्यामधील १६ कोटी ६० लाख इतकाच निधी खर्ची पडला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व तद् नुसार दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०१-०८-२०१८) :** (१) व (२) जिल्हाधिकारी रत्नागिरी यांचेकडून प्राप्त अहवालानुसार जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०१७-१८ मध्ये उपलब्ध रु.१७०.९९ कोटी निधी पैकी ७०% इतका निधी खर्च झाला होता,तथापी वित्त विभाग परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३,दिनांक ०१ फेब्रुवारी, २०१८, अन्वये जिल्हा वार्षिक योजना

(सर्वसाधारण) अंतर्गत जिल्ह्याला रु.१७०.९९ कोटी (१००%) निधी उपलब्ध होऊन ३१ मार्च २०१८ पर्यंत संपूर्ण रु.१७०.९९ कोटी इतका निधी खर्च करण्यात आला आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे विचखेडा व धुपे (ता.चोपडा,जि.जळगाव) या पुनर्वसीत गावठाणात गटाराची सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(४०) १११९६८ (०१-०४-२०१८). श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे विचखेडा व धुपे (ता.चोपडा, जि.जळगाव) या पुनर्वसीत गावठाणात गटाराची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली नसल्यामुळे तेथील ग्रामस्थ पुनर्वसित गावाठाणात जाण्यास तयार नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पुनर्वसित गावठाणात गटार बांधण्यासाठी जिल्हा वार्षिक योजनेतून निधी उपलब्ध करुन देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी जळगांव जिल्ह्याचे पालकमंत्री यांच्याकडे दिनांक ०९ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, निधी उपलब्ध करुन गटार सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३०-०७-२०१८) :** (१) नाही.
(२) प्रा. चंद्रकांत बळीराम सोनवणे, विधान सभा सदस्य, यांनी दिनांक ३१/१०/२०१७ च्या पत्रान्वये जिल्हा वार्षिक योजनेतून निधी मंजूर करण्याबाबतची विनंती मा.मंत्री (महसूल, मदत व पुनर्वसन, सार्वजनिक बांधकाम) (सार्वजनिक उपक्रम वगळून) यांना केली आहे.
(३) सन २०१८-१९ करिता सदर प्रकल्पाकरिता रु. ३५ कोटी निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. मौजे धुपे खु. व विचखेडा पुनर्वसन गावठाणातील १८ नागरी सुविधांपैकी आर. सी. सी. गटारांची (बांधीव उघड्या गटारी) बांधकामे पूर्ण करण्यात आलेली आहेत. मौजे धुपे खु. या गावठाणातील पुरविण्यात येणा-या नागरी सुविधांपैकी स्मशानभूमी व्यतिरिक्त उर्वरित नागरी सुविधांची कामे पूर्ण झालेली असल्याने सदर गावठाणात संबंधित ग्रामस्थांनी घर बांधकामे पूर्ण करुन वास्तव्य करीत आहेत. तसेच मौजे विचखेडा पुनर्वसन गावठाणातील आर. सी. सी. गटार बांधकामे पूर्ण करुन इतर नागरी सुविधांची कामे प्रगतीत आहेत. पुरवावयाच्या नागरी सुविधांपैकी बांधीव उघड्या गटारी ही नागरी सुविधा पुरवितांना ग्रामस्थांच्या मागणीनुसार गावामध्ये जमा होणारे पाणी गावाच्या आराखडयात दर्शविल्या प्रमाणे नैसर्गिक उताराप्रमाणे बाहेर न काढता सर्व पाणी एकाच मोठ्या आकाराची गटार बांधून गावाच्या पश्चिम बाजूस उतार देवून काढण्यात यावे, असे ठरले. या मागणीसाठी व भुखंड वाटपासंदर्भात सदर गावठाणातील ग्रामस्थांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे याचिका (रीट पिटिशन नं-७६८३/१४) दाखल केली होती. त्यानुसार मोठ्या गटारीच्या संरक्षणात्मक उपाययोजना भविष्यात पूर्ण करण्यात येणार आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भोर (जि.पुणे) तालुक्यातील हद्दीतील उजवा कालव्याचे अस्तरीकरण करण्याबाबत**

**(४१) ११२१३२ (११-०४-२०१८). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोर (जि.पुणे) तालुक्यातील चिखलगांव येथून बोगदयातून मौजे कान्हवडी (ता. खंडाळा, जि.सातारा) हददीपर्यंत धोम बलकवडी प्रकल्प (ता.वाई,जि.सातारा) या प्रकल्पाचा १४ कि.मी. चा भोर तालुक्याच्या हद्दीतील उजवा कालवा असून त्याचे अस्तरीकरण झालेले नसल्याने या कालव्याला ३-४ ठिकाणी गळती लागली आहे त्यामुळे या कालव्याची अस्तरीकरण करावे यासाठी लोकप्रतिनिधींनी दिनांक ६ डिसेंबर,२०१७ रोजी वा त्या सुमारास मा.जलसंपदा मंत्री यांना लेखी पत्राद्वारे विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विनंती पत्राची दखल घेवून सदर कालव्याचे अस्तरीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३१-०८-२०१८) :** (१) व (२) धोम बलकवडी, ता.वाई, जि.सातारा या प्रकल्पाच्या १४ कि.मी. चा भोर तालुक्याच्या हद्दीतील उजवा कालव्याचे अस्तरीकरण करावे यासाठी लोकप्रतिनिधीनी मा.मंत्री (जलसंपदा) यांना दिलेले निवेदन प्राप्त झालेले नाही.

तथापि, धोम बलकवडी उजवा कालवा भोर तालुक्यातील कि.मी. १२ ते २० मधील अस्तरीकरणाचे काम मार्च, २०१९ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कृष्णा-कोयना उपसा सिंचन योजनेतून ताकारी, दुधारी, रेठरेहरणाक्ष, भवानीनगर, येडेमच्छिद्र या गावांना पाणी देण्यासाठी सुधारित प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत**

**(४२) ११२३२० (१३-०४-२०१८). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाळवा तालुक्यातील (जि.सांगली) येथे कृष्णा-कोयना उपसा सिंचन योजनेतून ताकारी, दुधारी, रेठरेहरणाक्ष, भवानीनगर, येडेमच्छिद्र या गावांना पाणी देण्यासाठी सुधारित प्रशासकीय मान्यतेमध्ये सदर कामाचा समावेश झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामाची एकूण लांबी व खर्च किती येणार,

(३) असल्यास, सदर काम तात्काळ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३१-०८-२०१८) :** (१) होय.

ताकारी योजनेच्या टप्पा २ मधून ताकारी, दुधारी, रेठरेहरणाक्ष व भवानीनगर गावातील एकूण २६० हे. सिंचन क्षेत्रास शासनाने दि.२८/०८/२०१४ च्या पत्रान्वये लाभक्षेत्रात समावेश करण्यास तत्वत: मान्यता दिली आहे.

(२) व (३) ताकारी-दुधारी बंदिस्त पाईप लाईनद्वारे ताकारी, दुधारी, रेठरेहरणाक्ष व भवानीनगर गावातील २६० हे. क्षेत्रास सिंचनाचा लाभ देण्यासाठी सर्वेक्षण करण्यात आले असून, या कामासाठी एकूण ५२३० मी. लांबीची बंदिस्त नलिका वितरण व्यवस्था उभारणीची आवश्यकता आहे. या बंदिस्त पाईप लाईनच्या संकल्पनास मान्यता मिळाली असुन, त्यासाठी सर्वसाधारण रु.३०७.०० लक्ष खर्च अपेक्षित आहे. सदर कामाचे अंदाजपत्रकास मान्यता मिळाली असून निविदा कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### तुळजापूर (जि.उस्मानाबाद) तालुक्यातील धनेगाव साठवण तलावाचे काम पूर्ण करण्याबाबत

**(४३) ११२५९० (१२-०४-२०१८). श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्हाल्यातील तुळजापूर तालुक्यातील धनेगाव साठवण तलावास प्रशासकीय मान्यता दिलेली आहे काय व त्यासाठी किती अंदाजे खर्च अपेक्षित आहे,

(२) असल्यास, सदरील साठवण तलावाच्या निविदा काढल्या आहेत काय निविदा निश्चित करून कार्यारंभ आदेश दिले आहेत काय व काम किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३०-०७-२०१८) :** (१) कृष्णा मराठवाडा उपसा सिंचन योजना जि. उस्मानाबाद व जि. बीड योजनेस रु. ४८४५.०५ कोटी इतक्या किंमतीस शासन निर्णय, दिनांक २७/०८/२००९ अन्वये प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. धनेगांव साठवण तलाव सदर योजनेत समाविष्ट आहे.

(२) कृष्णा मराठवाडा उपसा सिंचन योजनेतील टप्पा क्र.२ अंतर्गत धनेगांव साठवण तलाव, जि. उस्मानाबाद या कामाची ई-प्रणाली ब-१ निविदा स्वीकृतीसाठी अपर मुख्य सचिव (वित्त) यांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या दिनांक २७/७/२०१७ रोजी संपन्न झालेल्या बैठकीमध्ये समितीने सदर कामाची निविदा स्वीकृत करणे उचित ठरणार नाही, असा निर्णय एकमताने घेतलेला आहे. त्यामुळे सदर कामाची निविदा स्वीकृत करण्यात आली नाही.

तसेच कामाची सलगता, अर्थोपायाची स्थिती, केलेल्या गुंतवणूकीव्दारे प्रत्यक्ष सिंचन क्षेत्र निर्माण होणे इत्यादी बाबी विचारात घेऊन यापुढे कामांचा प्राथम्यक्रम ठरवूनच कामे हाती घेण्याचा निर्णय पूर्ण विचाराअंती घेण्यात यावा व तसेच अशा प्रकारची कामे यांत्रिकी संघटनेमार्फत करण्याचा पर्याय देखील उपलब्ध असून त्याचाही विचार करण्यात यावा, असे दिनांक ६/१०/२०१७ च्या शासन पत्रान्वये कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांना कळविण्यात आले आहे.

(३) धनेगाव साठवण तलाव कृष्णा मराठवाडा प्रकल्पांतर्गत उपसा सिंचन योजना क्र. २ अंतर्गतच्या टप्पा-४ मध्ये समाविष्ट असून टप्पा-४ पर्यंतची कामे पूर्ण झाल्यावर धनेगाव साठवण तलावात उपसा करुन पाणी सोडण्यात येणार आहे. टप्पा-४ पर्यंतची सर्व कामे अपूर्ण असल्याने व उपलब्ध मर्यादित निधीची विभागणी टाळण्यासाठी कामे सलगतेने पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. यास्तव सद्य:स्थितीत धनेगाव साठवण तलावाचे काम हाती घेता येत नाही.

---

**गोदावरी महामंडळास तात्काळ निधी देऊन कालव्याची दुरुस्ती करण्याबाबत**

**(४४) ११४१६७ (११-०४-२०१८). डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विविध धरणांवरील, नद्यांवरील कालव्यांच्या दरवर्षी कराव्या लागणा-या दुरूस्तीची जबाबदारी आता गोदावरी महामंडळाकडे दिल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महामंडळानेही पाणीपट्टीतून येणा-या पैशातूनच कालव्यांची दुरुस्ती करण्याचा निर्णय घेतल्यामुळे यंदा कालवे दुरुस्तीसाठी आवश्यक असलेला निधीच उपलब्ध झाला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामुळे पाणी आवर्तन देताना पाण्याचा मोठ्या प्रमाणात अपव्यय होणार असून दुरुस्तीचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू महामंडळास तात्काळ निधी देऊन कालवे दुरूस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३०-०८-२०१८) :** (१) जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्रमांक: देवदु-२०१५/(८३६/२०१५)/सिंव्य (कामे), दिनांक १७.११.२०१६ अन्वये सिंचन प्रकल्पांचे व्यवस्थापन संबंधित पाटबंधारे महामंडळांकडे वर्ग करण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही.गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाने दि.१७.११.२०१६ ते मे,२०१८ या कालावधीत सिंचन व बिगरसिंचन पाणीपट्टी रक्कमेतून सिंचन प्रकल्पांच्या देखभाल व दुरुस्तीकरिता एकूण निधी रु.५५७६.१२ लक्ष निधी वितरीत केलेला आहे. त्यापैकी कालव्यांच्या दुरुस्तीकरीता एकूण रु.१४६५.४४लक्ष इतका निधी उपलब्ध करुन दिलेला आहे.

(३)अत्यावश्यक दुरुस्ती यांत्रिकी विभागामार्फत करण्यात आली आहे.

(४) गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाने दि.१७.११.२०१६ ते मे,२०१८ या कालावधीत सिंचन व बिगरसिंचन पाणीपट्टी रक्कमेतून सिंचन प्रकल्पांच्या देखभाल व दुरुस्तीकरिता एकूण रु.५५७६.१२ लक्ष निधी वितरीत केलेला आहे. त्यापैकी कालव्यांच्या दुरुस्तीकरीता एकूण रु.१४६५.४४लक्ष इतका निधी उपलब्ध करुन दिलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कडधे (ता.खेड,जि.पुणे) येथे वीज उपकेंद्रासाठी जागा मिळण्याबाबत

**(४५) ११४३३० (१२-०४-२०१८). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चासकमान धरण (ता.खेड,जि.पुणे) लगतच्या गावांना विद्युत पुरवठा करण्यासाठी धरण विभाग अखत्यारीतील कडधे गावामधील यांत्रिकी वसाहत मधील गट न.६९/१, ६९/२, ६९/३, ६९/४, ७३, ७४, ७५ मधील ३.८० आर जागा ३३/११ KV उपकेंद्रासाठी मिळण्याबाबतचा प्रस्ताव,कार्यकारी अभियंता (स्था.) म.रा.वि.वी. कंपनीने दिनांक १८ जानेवारी,२०१६ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा अधिकारी यांनी सदर प्रस्ताव उपकेंद्रासाठी आवश्यक असलेली जागा महसूल विभागाकडे वर्ग करावी असा प्रस्ताव कार्यकारी अभियंता, खडकवासला धरण विभाग पुणे यांचेकडे पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार ३३/११KV उपकेंद्रासाठी जागा उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०१-०९-२०१८) :** (१) होय.

(२) होय.

(३) चासकमान धरणाच्या अखत्यारीतील मौ. कडधे येथील गट क्र.७५ मधील ८० आर जागा महावितरणच्या ३३/११ के. व्ही. देण्याबाबतच्या विहित प्रस्ताव महामंडळाच्या कार्यकारी समिती/नियामक मंडळात ठेवण्यासाठी क्षेत्रीय कार्यालयाकडून कागदपत्रांची छाननी करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### चासकमान प्रकल्पातील (ता.खेड,जि.पुणे) प्रकल्प अहवालातील समावेशित असलेले वेताळे पुलाचे व जोडरस्त्याचे काम सुरु करण्याबाबत

**(४६) ११४९०२ (१२-०४-२०१८). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चासकमान प्रकल्पातील (ता.खेड,जि.पुणे) प्रकल्प अहवालातील समावेशित असलेले पुच्छ कालवा ते वेताळे जोडरस्त्याचे व पुलाचे काम प्रस्तावित असून अद्याप पर्यंत पूर्ण झाले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धरणावरून ये जा करणाऱ्या लोकांसाठी सदरचा पूल दळणवळणासाठी अत्यावश्यक असून त्वरित पुलाचे काम करण्याची मागणी प्रकल्पग्रस्त शेतकरी व स्थानिक लोकप्रतिनिधींनी कार्यकारी अभियंता चासकमान पाटबंधारे यांचेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने वेताळे पुलाचे व जोडरस्त्याचे काम सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३१-०८-२०१८) :** (१) होय.
(२) होय.
(३) चासकमान प्रकल्पाच्या कामांचा समावेश सन २०१७-१८ च्या प्रापणसुचीमध्ये केला होता. तथापि, या कामांना सुधारित प्रशासकीय मान्यता न मिळाल्याने ही कामे हाती घेता आली नाहीत. चासकमान प्रकल्पास सुधारित प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर सदरचे काम हाती घेण्याचे प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुक्ताईनगर, (जि.जळगाव) तालुक्यातील अपूर्ण असलेली पुनर्वसनाची कामे पूर्ण करण्याबाबत**

**(४७) ११५०३९ (१२-०४-२०१८). श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हतनूर धरणाच्या लाभक्षेत्रातील मुक्ताईनगर (जि.जळगाव) तालुक्यातील पुनर्वसनाची व मुलभूत सुविधांची कामे अपूर्ण असल्याने कामे पूर्ण करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी निवेदनाद्वारे मागणी केलेली आहे,हे ही खरे आहे काय,
(२) तसेच चौथ्या टप्प्यातील पुनर्वसनासाठी आवश्यक असलेला निधी किती दिवसात उपलब्ध करुन देणार आहे,
(३) असल्यास, सदर अपूर्ण कामे पूर्ण करण्यासह चौथ्या टप्प्यातील पुनर्वसनासाठी निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३१-०८-२०१८) :** (१) होय.
(२) व (३) हतनूर प्रकल्प पुनर्वसनांतर्गत चौथा टप्पा मंजूर नाही.
मौजे निंभोरासिम येथील ९५ घरांबाबतचा धोरणात्मक निर्णय शासनाने २००९ मध्ये घेतला असल्याने आता मौजे निंभोरासिम, तालुका रावेर, जिल्हा जळगांव येथील मागासवर्गीय वस्तीतील ९५ घरांचे खास बाब म्हणून पुनर्वसन करण्यासाठी रु. ४१६.४९ लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देण्याबाबत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागास विनंती करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**यवतमाळ जिल्हयातील बेंबळा प्रकल्पाचे काम पूर्ण करण्याबाबत**

**(४८) ११५७२४ (१२-०४-२०१८). श्री.विजय रहांगडाले (तिरोडा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यात शेतक-यांना सिंचनाची सोय पुरविण्यासाठी गेल्या ३५ वर्षापापूर्वी बेबळा प्रकल्प सुरु करण्यात आले असून अद्याप प्रकल्पाचे काम अपूर्ण आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार बेंबळा प्रकल्प तात्काळ पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२९-०८-२०१८) :** (१) धरण व कालव्याची कामे १०० टक्के पूर्ण झाली आहेत. वितरण प्रणालीची कामे ७८ टक्के पूर्ण असून उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत.

(२) बेंबळा प्रकल्पाचा समावेश केंद्र अर्थसहाय्यित प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेत करण्यात आला असून त्याकरिता प्राधान्याने निधी उपलब्ध करण्यात येतो. तसेच प्रकल्पाचे संनियंत्रण मा.मुख्यमंत्री यांच्या वाररुमच्या माध्यमातून करण्यात येते. नियोजनानुसार डिसे.२०१९ पर्यंत प्रकल्प पूर्ण करण्याचे नियोजन असून त्यानुसार उर्वरीत कामे प्रगतीपथावर आहेत.

(३) विलंब झालेला नाही.

तथापि, प्रकल्पाचे फेरनियोजन करण्यात आले असून विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाकडून दि.१३/४/२०१८ च्या पत्रान्वये, राज्य स्तरीय तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक यांचेकडे सुधारित प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव तांत्रिक तपासणीसाठी सादर करण्यात आला आहे. त्यानंतर सदर प्रस्तावास सक्षम स्तरावरून मान्यता प्राप्त झाल्यानंतर उर्वरित कामे पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

---

**पेट्रोल-डिझेलमध्ये झालेली दरवाढ**

**(४९) ११६७११ (२०-०७-२०१८). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ),**

**श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.भाऊसाहेब पाटील - चिकटगांवकर (वैजापूर), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.संजय कदम (दापोली), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र सरकारने पेट्रोल व डिझेलचे दर नियंत्रण मुक्त केल्याने तसेच पेट्रोल व डिझेलवरील उत्पादन शुल्क कमी होत नसल्याने व आतंरराष्ट्रीय बाजारपेठेत कच्च्या तेलाच्या किंमतीनुसार देशातील इंधनाचे दर ठरत असल्याने दिनांक १ एप्रिल,२०१८ पासून पेट्रोलचे दर रु.८१.५९ तरे डिझेलचे दर रु.६८.७० प्रतिलिटर झाले व दिनांक २६ मे,२०१८ रोजीपासून पेट्रोल ८५ रुपये व डिझेलच्या ७४ रुपये वाढ झालेली असून दररोज दरवाढ केल्श जास्त असल्याने गेल्या चार वर्षानंतर हे दर उच्चांक पातळीवर पोहचले आहे,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, देशातील अन्य राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्र राज्यात पेट्रोल व डिझेलचे दर सर्वाधिक असल्याची बाब माहे मे,२०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले,हे ही खरे आहे काय,

(३) तसेच सन २०१५ मध्ये दुष्काळ निवारण्यासाठी पेट्रोल,डिझेलवर लावलेला दोन रुपये प्रति लिटरचा अधिभार दुष्काळ संपला तरी अजूनही सुरु असून महाराष्ट्रात सध्या पेट्रोलवर २५ व्हॅट आणि ११ रुपये प्रतिलिटर अधिभार आकारला जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार पेट्रोल-डिझेलवरील करदर रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२०-०८-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अन्य राज्याच्या तुलनेत महाराष्ट्रात पेट्रोलचा दर सर्वाधिक आहे. हे खरे आहे. परंतु डिझेलचा दर सर्वाधिक आहे, हे खरे नाही.

(३) हे खरे नाही. मुंबई, ठाणे, नवी मुंबई, नागपूर, सोलापूर, औरंगाबाद, अमरावती, नंदूरबार येथे पेट्रोलवर २६%+९ रु.प्रति लिटर एवढा कर आकारला जातो व उर्वरित महाराष्ट्रात २५% + ९ रु प्रति लिटर एवढा कर आकारला जातो.

(४) राज्य शासनाने या आधीच दिनांक ११ ऑक्टोबर २०१७ पासून पेट्रोलवरील करदरामध्ये रु.२ प्रतिलिटर व डिझेलवरील करदरामध्ये रु.१ प्रतिलिटर घट केली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हातमागावर पैठणी साडी तयार करण्यासाठी लागणारे रेशीम व जरी या कच्च्या मालासोबतच पैठणी विक्रीला जीएसटी मधून करमाफी मिळण्याबाबत**

**(५०) ११७०६९ (२०-०७-२०१८). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हातमागावर पैठणी साडी तयार करण्यासाठी लागणारे रेशीम व जरी या कच्च्या मालासोबतच पैठणी विक्रीला जीएसटी मधून करमाफी मिळावी याकरिता वस्तू व सेवा कर परिषदेकडे राज्यामार्फत शिफारस करण्यात येईल असे शासनाने दिनांक १ ऑगष्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास आश्वासन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पैठणी उद्योग हा भारतातील अभिजात कला , हस्तकला जोपासणारा उद्योग असल्यामुळे पैठणीचे महाराष्ट्राच्या संस्कृतीशी असलेले नाते लक्षात घेवून पैठणीसाठी लागणारा कच्चा माल व पैठणीवर वस्तू व सेवा कराची आकारणी करू नये अशी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २७ सप्टेंबर, २०१७ व दिनांक १६ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीनुसार पैठणी व त्याच्या कच्चा मालावर वस्तू व सेवा कर माफ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२०-०८-२०१८) :** (१) होय, खरे आहे.

(२) होय, खरे आहे.

(३) राज्य शासनाने दिनांक २७ ऑक्टोबर, २०१७ रोजी जीएसटी परिषदेस पैठणीवर कर माफ करण्याबाबत शिफारस केली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**
**मुंबई.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.